# Level 4 and 5 --- Reading passages -- Exam 2015

कोण होते हे आर्य? ते कोठून आले? ते रहात होते आग्नेय युरोपात. कॉकेशियस पर्वताच्या आसपास त्यांच्या अनेक टोळ्या होत्या.

सुमारे चार हजार वर्षांपूर्वी आर्य लोक वायव्य दिशेने खैबर खिंडीतून भारतात येऊ लागले. हे लोक उंचेपुरे, रंगाने गोरेपान व धष्टपुष्ट असे होते. त्यांचे डोळे तेजस्वी होते. त्यांच्या अंगावर लोकरीचे कपडे असत. त्यांच्यापैकी कुणी वेगवान घोड्यावर बसून येत तर कुणी रथातून येत. त्यांच्या हातात धनुष्य आणि पाठीवर बाणांचा भाता असायचा. काही जणांच्या हातात भाले आणि परशू म्हणजे कुऱ्हाडी असत. अशा या लोकांच्या टोळ्या मागून टोळ्या भारतात आल्या. भारतातील लोकांनी त्यांना विरोध केला. एकमेकांमध्ये लढाया झाल्या; पण आर्य लोकांपुढे त्यांचा पराभव झाला. आर्यांनी भारतातील लोकांना जिंकले. त्यांच्यावर राज्य केले.

प्रश्न

१) आर्य भारतात कोठून आले?
२) हे लोक कसे येत होते?
३) त्यांच्या हातात कोणती शस्त्रे होती?
४) आर्य दिसायला कसे होते?
५) लढाई कोण जिंकले?

# Level 4 and 5 --- Reading passages -- Exam 2015

भारताच्या दक्षिणेला श्रीलंका हा देश आहे. तसेच पश्चिम दिशेकडे आसपास अनेक लहान लहान बेटे आहेत. ती बेटे ओलांडून हिंदी महासागर पार केला की पलीकडे आफ्रिका खंड आहे. त्याच्या टोकाचा देश म्हणजे दक्षिण अफ्रिका. या देशाजवळ एक बेट आहे त्याचं नाव मादागास्कर. भारतातील पावसाची सुरूवात या ठिकाणापासून होते. इथून मान्सूनचे वारे वाहायला सुरवात होते. ते भारतात येत असताना वाटेत भलामोठा हिंदी महासागर आहे. तिथे उन्हामुळे पाण्याचे बाष्प होते. त्याचे भरपूर ढग तयार होतात. मान्सूनचे वारे या ढगांना आपल्यासोबत भारतात आणतात मग भारतात धो धो पाऊस पडतो. काही महिन्यांनी हे वारे परत उलट दिशेने वाहायला लागतात तेव्हा भारतातला पावसाळा संपतो. मान्सूनचे वारे पुन्हा या मादागास्करच्या दिशेने परत येतात.

महाराष्ट्रात 'पावश्या' पक्षी दिसला, की पाऊस लवकरच येणार असल्याचे लोक मानतात आणि शेतकरी कामाला सुरवात करतात.

प्रश्न

१) आफ्रिका खंड भारताच्या कोणत्या दिशेला आहे?

२) भारतात पाऊस कसा पडतो?

३) भारतातला पावसाळा केंव्हा संपतो?

४) भारताच्या दक्षिणेला कोणता सागर आहे?

५) कोणता पक्षी दिसला की पाऊस येणार असल्याचे लोक मानतात?

# Level 4 and 5 --- Reading passages -- Exam 2015

## म्हशींचा पलटवार

जंगलात सिंहाचे राज्य चालते आणि त्याच्या एका गर्जनेने अख्खे जंगल हादरून जाते सिंह कोणत्याही प्राण्याची शिकार करतो, एवढी ताकद त्याच्यात असते. मात्र कधी-कधी त्याला छोट्या-छोट्या प्राण्यांपुढे पराभव स्वीकारावा लागतो. अशीच एक घटना केनियाच्या मसाई मारा या ठिकाणी घडली. झाले असे, की सिंह आणि सिंहीण जंगली म्हशींची शिकार करण्यासाठी निघाले. सिंह आणि सिंहीण म्हशींच्या घोळक्यावर झेप मारणार, तोच म्हशींची नजर त्यांच्यावर पडली आणि म्हशींनी सिंहांवर धारदार शिंगांनी पलटवार केला.

म्हशींच्या पलटवारानं तर सिंहीण पळून गेली. परंतु सिंह शिकार करण्याचा प्रयत्न करत राहिला. मात्र म्हशींच्या घोळक्याने एकजुटीने त्याच्यावर जोरदार पलटवार केला. सिंहावरच संकट कोसळले. सिंहाला भीती वाटली आणि त्याने तिथून पळ काढला. म्हशींनी दूरपर्यंत त्याचा पाठलाग केला. सिंह झाडांमध्ये जाऊन लपला आणि म्हशींनी त्याचा पाठलाग सोडला.

प्र .१. सिंहाला जंगलाचा राजा का म्हणतात?

प्र .२. वरील घटना कुठे घडली?

प्र .३. घोळका म्हणजे काय?

प्र .४.म्हशींनी सिंहाला कसे पळवून लावले?

प्र .५.ह्या घटनेवरून काय शिकता येईल?